# आता भरा एसएमएसने वीज बील
# उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

मुंबई, दि. २८.०४.२०११ :-

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या विद्युत ग्राहकांना आता आपले वीज बील मोबाईलवरून एसएमएसद्वारे भरण्याची सोय आजपासून उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि ऊर्जामंत्री ना. श्री. अजित पवार यांच्या हस्ते या सेवेचा औपचारिक प्रारंभ आज मुंबईत करण्यात आला. या प्रसंगी ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. सुब्रत रथो, महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक श्री. अजय मेहता, महावितरणचे प्रकल्प संचालक श्री. मारुती देवरे, महापारेषणचे संचालक श्री. उत्तम झाल्टे, माहिती तंत्रज्ञान विभागाचे मुख्य महाव्यवस्थापक श्री. उत्तम माने व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

एसएमएसद्वारे वीज बील भरण्यासाठी ग्राहकांना 567678 या क्रमांकावर नोंदणी करावी लागेल. त्याची कार्यपध्दती अशी : टाईप *MSEDCL* (स्पेस) *REG* (स्पेस) *बारा अंकी ग्राहक क्रमांक* (स्पेस) *बिलींग युनिट क्रमांक* (स्पेस) *१६ अंकी क्रेडीट कार्ड क्रमांक* (स्पेस) क्रेडीट कार्डाची अंतीम वैधता (एक्सपायरी डेट)- *महिना व वर्ष.* असा मजकूर टाईप करून तो वरील क्रमांकावर पाठवावा म्हणजे नोंदणीची प्रक्रिया पूर्ण होईल. अशाप्रकारे नोंदणी झाल्यानंतर ग्राहकास आपले वीज बील दरमहा एसएमएसवर मिळेल. याशिवाय नोंदणीकृत ग्राहकाला कधीही आपल्या चालू बिलाचा तपशील हवा असल्यास *MSEDCL* (स्पेस) *Bill* (स्पेस) *ग्राहक क्रमांक* (स्पेस) *बिलींग युनीट क्रमांक* देऊन त्याच क्रमांकावर एसएमएस पाठविल्यास तो उपलब्ध होऊ शकेल.

याशिवाय Interactive Voice Response System (IVRS) मार्फतही मोबाईल, लँड लाईनद्वारे वीज बील भरणा करता येईल. यासाठी 022-29213100 या क्रमांकावर संपर्क साधावा लागेल.

ज्या मोबाईलधारकांकडे GPRS किंवा 3G ही अद्यायावत सेवा उपलब्ध आहे, असे ग्राहक वीज बील भरण्याचे Client Software डाऊनलोड करून Install करू शकतात. यासाठी 54959 या कोडवर ATOM असा एसएमएस पाठविल्यावर ते सॉफ्टवेअर डाऊनलोड करण्याची लिंक मिळते. या सुविधेमार्फतही वीज बील भरता येऊ शकते.

महावितरणच्या ग्राहकांना वीज बील भरण्यात अडचणी येऊ नयेत, सहजपणे वीज बील भरता यावे म्हणून वीज बील भरण्यासाठी पारंपारिक वीज बील भरणा केंद्राशिवाय संगणकाच्या मदतीने ऑनलाईन वीज बील भरण्याची सोय यापूर्वीच उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. शिवाय वीज बील स्विकारणाऱ्या एटीपी (ATP) मशीन्स अनेक शहरांमधून बसविण्यात आलेल्या आहेत. या जोडीला आता एसएमएसद्वारे वीज बील भरण्याची सहज सोपी आणि ग्राहकांचा वेळ वाचविणारी सेवा उपलब्ध झाली आहे.

दूरध्वनी क्र. २६४७४२११,
विस्तार क्र. ३६१७.

**उपमुख्य जनसंपर्क अधिकारी.**

